| | |
|---|---|
| | पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.<br>करआकारणी व करसंकलन विभाग |
| परिपत्रकाचे स्वरुप | मालमत्ता हस्तांतरण फी आकारणीबाबत सुधारित कार्यपध्दती |
| परिपत्रक क्रमांक | कर/मुख्य/9/कावि/ 98 /2022, दिनांक 01 / 04/2022 |
| विषय : | मालमत्ता हस्तांतरण फी आकारणीबाबत... |
| कोणाच्या माहिती / कार्यवाहीसाठी | मालमत्ता कर आकारणी, तसेच वसूली करणारे सर्व अधिकारी / कर्मचारी |
| संदर्भ | १.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड प्रकरण 8 कराधान नियम 1<br>२. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड प्रकरण 8 कराधान नियम 2(3)<br>३. नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्र.एमसीओ-2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दिनांक 03 मार्च 2022<br>४. मा.प्रशासक यांचेकडील ठराव क्रमांक 08,दिनांक 29 /03/2022 |

परिपत्रक,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 127 व 129 मधील तरतूदीनुसार मालमत्ता कराची आकारणी करणेत येते. आकारणी केलेल्या मिळकतींची अनुसूची ड प्रकरण 8 कराधान नियमातील नियम 9 नुसार आकारणी पुस्तकात (असेसमेंट रजिस्टर) मिळकतीच्या नोंदी घेणेत येतात. अशा आकारणी पुस्तकात असलेल्या नोंदीमध्ये मिळकतीचे खरेदी / विक्री, वारसाहक्क इत्यादीमुळे हस्तांतरण झालेस त्याच्या नोंदी उपरोक्त संदर्भीय 1 व 2 नुसार करण्यात येतात व याप्रकरणी सद्यस्थितीत खालीलप्रमाणे कार्यपद्धती अवलंबणेत येत आहे.

❖ प्रचलित कार्यपध्दती

1. मिळकत हस्तांतरण अर्ज, अर्जासोबत खरेदीचे दस्तऐवज, मिळकत उतारा व अर्ज ज्या वर्षात प्राप्त होईल, त्या वर्षअखेरचा संपूर्ण मिळकत कर भरणा करुन घेऊन असेसमेंट रजिस्टरला नमूद असलेल्या करयोग्य मूल्याच्या 5% मिळकत हस्तांतरण फी वसूल करणेत येऊन हस्तांतरण कार्यवाही करणेत येते.
2. हस्तांतरण अर्ज ज्या वर्षात प्राप्त होईल त्या वर्षात हस्तांतरणाची कार्यवाही करण्यात येते. तथापि मिळकतधारक यांचेकडील खरेदी / विक्री दस्तऐवज पूर्वीचा असला तरी त्यासाठी कोणत्याही प्रकारची विलंब फी आकारली जात नाही.
3. वारसा हक्काने हस्तांतरण प्रकरणी वरीलप्रमाणे कार्यवाही करणेत येते.

कर आकारणी व कर संकलन विभाग स्थायी स्वरुपाचे उत्पन्न मिळवून देणारा विभाग आहे. शहराचा वाढता विस्तार व होणारे नागरीकरण, नागरी सुविधा व विकास कामावर होणारा खर्च तसेच महानगरपालिकेस हस्तांतरण फी द्वारे प्राप्त होत असलेले उत्पन्न विचारात घेता मालमत्ता हस्तांतरण फी कार्यपध्दतीत सन 2022-2023 पासून खालीलप्रमाणे सुधारणा करणेत येत आहे.

कृपया मागे पहा....

परिपत्रक क्रमांक कर/मुख्य/9/कावि/ ९8 /2022, दिनांक ०1 / ०4/2022 चे संलग्न.......

❖ मिळकत हस्तांतरण फी आकारणीबाबत सुधारित कार्यपध्दती :

1. खरेदीखत / विक्री / बक्षीसपत्र या सारखे दस्त नोंदविताना नोंदणी मुद्रांक शुल्क विभागामार्फत त्या मिळकतीचे चालू बाजारभावाचे मूल्यांकनावर आधारित किंमत ठरवून त्या किंमतीवर Stamp Duty वसूल करणेत येते. सन 2022-2023 पासून सदर दस्तऐवजानुसार Stamp duty ठरविण्यासाठी शासनाने जे बाजारमूल्य विचारात घेतले आहे, त्या बाजारमूल्याचे 0.50% मिळकत हस्तांतरण फी आकारणेत यावी.
2. मयत / रक्तसंबंधी कौटुंबिक वाटणीपत्र / रक्तसंबंधी बक्षीसपत्र / वारसा हक्क प्रमाणपत्र अशा प्रकरणी जिथे प्रत्यक्ष आर्थिक व्यवहार घडून आलेला नाही तिथे शासनाने निश्चित केलेले मुद्रांक शुल्क व हस्तांतरण फी रुपये 500/- यामध्ये कमी असलेली रक्कम ही हस्तांतरण फी राहील.
3. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात हस्तांतरण संलेख झालेनंतर उपरोक्त 1 चे प्रकरणी 03 महिन्यात व उपरोक्त 2 चे प्रकरणी 01 वर्षाचे आत मा.आयुक्तास नोटीस देणे नमूद आहे. (प्रकरण 8 कराधान नियम 1 अन्वये) सदर तरतूदीचे अनुषंगाने सन 2022-2023 पासून मिळकत खरेदी /विक्री दस्तऐवजाचे दिनांकापासून तसेच मयत / कौटुंबिक वाटणीपत्राचे दिनांक पासून 01 वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेस वरील देय होणा-या हस्तांतरण फी रक्कमेच्या 10% प्रती वर्ष याप्रमाणे विलंब शुल्क आकारणेत यावे.
4. हस्तांतरण प्रकरणी कार्यवाही करताना हस्तांतरण फी रक्कम वगळता अन्य कार्यपद्धती पूर्वी प्रमाणेच राहील.
5. दिनांक 01 एप्रिल 2022 पासून दाखल होणाऱ्या सर्व प्रकारच्या हस्तांतरण अर्जांवर हस्तांतरण फी व विलंब शुल्क आकारणीबाबत उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करावी.
6. दि. 31/03/2022 पुर्वी मालमत्ता हस्तांतरणासाठी प्रकरण दाखल असलेस व प्रकरण प्रलंबित असलेस अशा प्रलंबित प्रकरणी दि.31/03/2022 पुर्वीचे धोरणानुसार हस्तांतरण फी वसुल करणेत यावी.

सदर परिपत्रक सर्व अधिकारी /कर्मचारी यांचे निदर्शनास आणून देणेत यावे व दिनांक 01/04/2022 पासून सदर परिपत्रकाची अंमलबजावणी करणेत यावी.

31/03/22

(राजेश पाटील)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी 411 018

प्रति – सर्व क्षेत्रीय कार्यालय व करसंकलन विभागीय कार्यालय

प्रत - 1.लेखा विभाग

2/- अंदाजपत्रकात विलंब शुल्क जमा करणेकामी 'हस्तांतरण फी विलंब शुल्क'लेखाशिर्ष नव्याने निर्माण करून त्यामध्ये हस्तांतरण फी विलंब शुल्काची रक्कम जमा करावी.

2. माहिती व तंत्रज्ञान विभाग / TECH - 9

3/- परिपत्रकामध्ये नमूद केलेनुसार संगणक आज्ञावलीमध्ये योग्य ते बदल करावेत